

# महाविद्यालयाच्या भूगोल विभागाचे पेटंट प्रकाशित

**सिन्नर । दि. १८ वार्ताहर**

येथील सिन्नर महाविद्यालयातील भूगोल विभागाने नुकतेच 'लोकसंख्येचा आरक्षणावर परिणाम' या विषयावर आपले पेटंट प्रकाशित केले.

सदर पेटंट भूगोल विभागातील पदव्युत्तर शिक्षण घेत असलेला विद्यार्थी ऋषिकेश पगारे, भूगोल विभाग प्रमुख प्रा. संदीप भिसे, डॉ. बाळासाहेब तांबे, प्रा. ललित कळसकर, प्रा. राजेंद्र खुर्चे, प्रा. कविता नवले यांच्या नावावर आहे. पेटंटमध्ये भारतात वेगाने वाढणारी लोकसंख्या आणि तिचा आरक्षणावर होणारा परिणाम ही संकल्पना मांडलेली आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे आरक्षणाची टक्केवारी वाढवावी लागते आणि त्यामुळे आरक्षणाच्या टक्केवारीने अलीकडे शतक पार केले आहे. भारतासारख्या विकसनशील देशांसमोर ही मोठी समस्या निर्माण होत आहे आणि त्यामुळेच हे पेटंट महत्त्वाचे ठरणार आहे. हे पेटंट प्रकाशित होण्यासाठी रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. मनोज गवारे, प्रा. अंकिता रायते यांनी मेहनत घेतली. या यशाचे मविप्र सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, तालुका संचालक कृष्णाजी भगत, नांदेड विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.पंडित विद्यासागर, प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ, उपप्राचार्य आर. व्ही. पवार यांनी स्वागत केले.